|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

जळगाव 12 ( ) महोत्सव केवळ संख्यात्मक यशस्वी न होता गुणात्मक दृष्टीने यशस्वी होणे आवश्यक आहे. त्यासाठी कला सादरीकरण करण्यासाठी व्यासपीठ मिळते आणि हे व्यासपीठ व्यक्तिमत्वाला आकार देण्याचे कार्य करीत असते. असे प्रतिपादन विद्यापीठस्तरीय युवारंग युवक महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांनी केले.

विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवाला आज दिनांक 12 फेब्रुवारी रोजी सुरूवात झाली उद्‌घाटन करताना कुलगुरू बोलत होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, युवारंग युवक महोत्सवाचे कार्याध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप रामू पाटील, कुलसचिव बी.बी.पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र.संचालक प्रा.ए.बी.चौधरी, वित्त व लेखाअधिकारी डॉ.बी.डी.कऱ्हाड, निरीक्षक प्रा.विलास चव्हाण, प्रा.सत्यजित साळवे, प्रा.राम पेटारे, प्रा.पंकजकुमार नन्नवरे, प्रा.अजय सुरवाडे, प्राचार्य एम.बी.पाटील, डॉ.एम.के.पाटील तसेच विद्यार्थी परिषदेचे सर्व सदस्य उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू म्हणाले की, जिल्हास्तरावरील युवारंग महोत्सवामुळे ग्रामिण भागातील महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढलाय यामुळे मुलींच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. आणि ही वाढलेली संख्या युवक महोत्सव यशस्वी झाल्याचे संकेत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्याध्यक्ष दिलीप रामू पाटील यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, खान्देशाच्या भूमीतअनेक चांगले कलावंत आहेत या युवारंग मुळे तुमचा देखील त्यात सहभाग झाला असून विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने राबविलेल्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. यावेळी विद्यार्थी परिषद सदस्य गोविंद पाटील याने विद्यार्थ्यांना शपथ दिली. प्रास्ताविक विद्यार्थी कल्याण विभागाचे प्र.संचालक प्रा.एस.टी.इंगळे यांनी केले. सुत्रसंचालन डॉ.आशुतोष पाटील यांनी तर आभार डॉ.अजय सुरवाडे यांनी मानले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात युवारंग युवक महोत्सवाचे उद्‌घाटन सत्रानंतर तरूणाईने विविध कलाविष्कार सादर करीत आजची पिढी आजू बाजूच्या घटनांकडे अत्यंत गंभीरपणे बघत असल्याचे दाखवून दिले. या व्यक्त होण्यामध्ये जल्लोष जसा होता तसाच ललितकलेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे आपलेपण देखील व्यक्त होत होते. स्त्री भ्रुण हत्या, अंधश्रध्दा, बळीराजाची आत्महत्या, स्त्री-पुरूष समानता, प्रेम, मैत्री, सोशल मिडीयातून होत असलेला सामाजिक परिवर्तनाचा प्रयत्न अशा विविध विषयावर कधी हलके-फुलके तर कधी गंभीर होत मुकनाट्य, ललितकला, समुहगायन  या कलाप्रकारांमधून आपल्या परीने अत्यंत प्रभावीपणे व्यक्त होत युवारंग युवक महोत्सव तरूणाईने गाजवला.

दीक्षांत सभागृहातील रंगमंच क्रमांक 1 वर विडंबन, मुकनाट्य आणि मिमिक्री हे कलाप्रकार सादर झाले. मुकनाट्यात देशप्रेम, राणी लक्ष्मीबाई, महात्मा गांधी आदी विषय हाताळण्यात आले. तर विडंबनाद्वारे सरकारी योजनांचा लाभ, स्वच्छता मोहिम, जातीय विषमता, निषेद मोर्चा, कार्यालयीन कामकाजाची पध्दत, सेल्फीचा मोह, भ्रष्टाचार हे विषय हाताळण्यात आले. मिमिक्रीमध्ये नाना पाटेकर, फेरीवाला आदींच्या नकला सादर झाल्या. या मंचावर सायंकाळी शास्त्रीय नृत्याचा आविष्कार सादर करण्यात आला तर उशिरा समुह लोकनृत्य सुरू झाले.

रंगमंच क्रमांक 2 म्हणजे अधिसभा सभागृहात शास्त्रीय गायन, सुगम गायन (भारतीय), समुह गीत (भारतीय) हे कलाप्रकार सादर झाले. रंगमंच क्रमांक 3 वर तालवाद्य, सुरवाद्य, भारतीय लोकगीत आणि लोकसंगीत हे कलाप्रकार विद्यार्थ्यांनी सादर केले. लोकगीताद्वारे ग्रामिण भागाशी असलेली नाळ विद्यार्थ्यांनी अत्यंत ताकदीने सादर केली.

रंगमंच क्रमांक 4 पर्यावरणशास्त्र विभागाच्या सभागृहात वक्तृत्व, काव्यवाचन आणि वादविवाद स्पर्धा झाल्या. वक्तृत्वासाठी हरवत चाललेले खाजगी आयुष्य हा विषय देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी आपल्या खासगी आयुष्याचा ताबा सोशल मिडीयाने कसा घेतला आहे हे वक्तृत्वातून सांगितले तर वादविवादासाठी आमचा विवेकवाद संपुष्टात आला आहे ! हा विषय देण्यात आला होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी कलबुर्गी, पानसरे, दाभोळकर यांच्या हत्येचा उल्लेख करत विवेकवाद संपत असल्याचे मांडले तर प्रतीस्पर्ध्याने विवेकवाद अजूनही शिल्लक असल्यामुळे समाधानाने लोकं नांदत असल्याचे स्पष्ट केले.

रंगमंच क्रमांक 5 व 6 वर रांगोळी, चित्रकला, कोलाज, स्पॉट पेंटींग, फोटोग्राफी, इन्स्टॉलेशन, क्ले मॉडेलिंग, व्यंगचित्र हे कलाप्रकार सादर झाले. रांगोळी साठी महिला अत्याचार, डिजीटल इंडिया, भारतीय सैन्य, शेतकरी आत्महत्या, झाडे वाचवा, राष्ट्रीय एकात्मता, निसर्ग, व्यसनमुक्ती आदी विषय हाताळले तर पेन्टींग कला प्रकारात राष्ट्रीय एकात्मता, झाडे वाचवा, भ्रष्टाचार, धुम्रपान, पाणी वाचवा, सोशल मिडीयाचे भूत अवतरले, मुली वाचवा हे विषय हाताळले.

दिवसभर विविध रंगमंचावर कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, माजी आमदार शिरीष चौधरी, युवारंग युवक महोत्सवाचे कार्याध्यक्ष दिलीप रामू पाटील, कुलसचिव बी.बी.पाटील, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिसभा सदस्य यांनी भेटी दिल्या.

उद्या बक्षीस वितरण

उद्या मंगळवार दिनांक 13 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता दीक्षांत सभागृहात पारितोषिक वितरण समारंभ होणार असून खान्देशातील रंगकर्मी व कॉमेडीची बुलेट ट्रेन फेम श्याम राजपूत यांच्या हस्ते पारितोषिके दिली जाणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील राहतील. प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, युवक महोत्सवाचे कार्याध्यक्ष दिलीप पाटील यांची उपस्थिती असेल.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. १२ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,<br>स्वाक्षरीत प्रत/-<br>(सुनील पाटील)<br>जनसंपर्क अधिकारी